I 8 49

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** निलंगा **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0057 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/02/2020 22:09 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 26/02/2020
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2020
**Time From (वेळेपासून):** 18:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:40 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/02/2020 **Time (वेळ):** 22:09 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 028 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/02/2020 22:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 03 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** खाजगी तलाठी कार्यालय, दादापिर दर्गा जवळ निलंगा ,निलंगा

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अजय आबासाहेब पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खडकउमरगा,निलंगा ,निलंगा,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खडकउमरगा,निलंगा ,निलंगा,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9764054916

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बालाजी केशवराव भोसले | | | 1. किल्लारी ,आंैसा ,निलंगा,लातूर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000/रुपये दराची 01 चलनी नोट व 500/रुपये दराच्या 06 चलनी नोटा असे एकुण 5,000/रुपये | 5,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपये दराच्या डम्मी 20 नोटा | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 15,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गुन्हयाची हकीकत - आज रोजी आम्ही पो ठाणे अंमलदार म्हणून ड्यूटीस हजर असताना यातील नमूद फिर्यादीने पो स्टे हजर येवून लेखी फिर्याद दिली त्यातील मजकूर खालील प्रमाणेफिर्याद दिनांक 26/02/2020मी अजय आबासाहेब पाटील वय 40 वर्षे व्यवसाय शेती, रा. खडकउमरगा ता. निलंगा जि. लातूर मो.नं. 9764054916 समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती व्यवसाय करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 26/02/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर चे पोलीस उपअधीक्षक बेद्रे साहेब यांना फोनवर संपर्क करुन एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची माझी तक्रार आहे. असे सांगुन मी निलंगा येथे थांबतो तुम्ही या असे सांगितले होते. मी निलंगा येथे सुमारे 14.30 वा. थांबलो असताना मला पोलीस उपअधीक्षक बेद्रे साहेब यांनी फोन करुन त्यांनी मला आयटीआय कलेज निलंगा येथे बोलावुन घेवुन शासकीय वाहनात बसवुन मला पोलीस निरीक्षक दराडे व सापळा पथकातील सदस्य व पंचाची ओळख करून देवुन मला नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे. आमची मौजे खडकउमरगा शिवारात गट नंबर 1 व 118 मध्ये वडीलोपार्जीत शेती असुन सदर शेती ही माझ्या व माझे भाउ नामे संतोष व सचिन यांच्या नावे असुन ती शेती माझी पत्नी व भावजयांच्या नावाने फोड करुन फेर करण्यासाठी आम्ही शंभर रुपयाच्या बंन्डवर वाटणीपत्र तयार करुन दिनांक 04/02/2020 रोजी आमच्या गावचे तलाठी यांच्याकडे अर्ज केला होता. मी त्यांच्याकडे दिनांक 25/02/2020 रोजी गेलो असता आमच्या गावचे तलाठी यांनी माझ्या व माझे भावाच्या नावाने असलेली जमीनीचा वाटणीपत्राप्रमाणे माझी पत्नी व भावजयांच्या नावाने फोड करुन फेर करुन देण्यासाठी 15,000/-रुपये लाचेची मागणी केलेली आहे. मला माझ्या वरील कामासाठी संबंधीत तलाठी यांना लाच देण्याची इच्छा नाही. तरी सबंधीत तलाठी यांनी माझ्या वरील कामासाठी लाचेची मागणी करुन ती स्वतः अथवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांच्यावर कार्यवाही करावी. अशा आशयाची लेखी तक्रार दिली होती. मी दिलेली तक्रार ही पोलीस उपअधीक्षक बेद्रे व पंचानी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.पोलीस उपअधीक्षक बेद्रे साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधीत तलाठी यांनी मला माझा वर नमुद कामासाठी लाचेची मागणी केली आहे. अगर कसे ? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन व ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन त्यामध्ये नविन कोरे मेमरी कार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन त्यांनतर आम्ही सर्वजन सरकारी जीपने तलाठी यांच्या खाजगी कार्यालया जवळील दादापिर दर्ग्याच्या आडबाजुस सरकारी जीप उभी करुन बेद्रे साहेब यांनी

सापळा कार्यवाही बाबत मला व पंच क्रमांक 1 तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. पोलीस उपअधिक्षक बेद्रे साहेब यांनी पोना सुरवसे यांचे मार्फतीने 15.50 वा. डिजीटल व्हईस रेकर्डचे बटन चालु करुन ते माझा गळयात आडकावुन मी पंच क्रमांक 1 टेकाळेसह माझ्याकडील मोटार सायकलवर संबंधीत तलाठी यांच्या खाजगी कार्यालयात जावुन त्यांची पंचासमक्ष भेट घेवुन माझ्या कामाच्या अनुषंगाने त्यांच्याशी चर्चा करुन काय झाले आपले कामाचे असे विचारणा केली असता त्यावेळी संबंधीत तलाठी म्हणाले की, माझ्याकडल झालय सगळ, तुमच्या नोटीसवर सहया घेतलो. फक्त आता मंजुरीच काम हाय त्यावर मी त्यांना आता कुणाकडे आडले त्यावर तलाठी म्हणाले की तुमच्याकुणच आडल त्यावर मी त्यांना मग किती दयाचे सांगा आज उदया त्यावर तलाठी म्हणाला की मी तुम्हाला अमाउंटच सांगितलो... पंधार दया त्यावर मी त्यांना पंधार देवु त्यावर तलाठी म्हणाले की उदया आणुन दया किंवा आज दया लगेच कराया लावतो त्यावर मी त्यांना येतो म्हणुन मी व पंच क्रमांक 1 टेकाळे असे मोटार सायकलवरुन थांबविण्यात आलेल्या शासकीय वाहनाजवळ परत आलो असता पोना सुरवसे यांनी माझ्याकडील व्हईस रेकर्डर बंद करुन पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 टेकाळे यांना लाचेची मागणीच्या अनुषंगाने माझ्यात व संबंधीत तलाठी यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 टेकाळे यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही सर्वांनी पोलीस कर्मचारी सुरवसे यांचे मार्फतीने डिजीटल व्हईस रेकर्डर चालु करुन आमच्यात व संबंधीत तलाठी यांच्यात झालेले संभाषण ऐकुन ते पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन संबंधीत तलाठी यांनी माझा वर नमुद कामासाठी माझ्याकडे स्पष्टपणे 15,000/-रुपये लाचेची मागणी करुन घेवुन येण्यास सांगितल्याने त्यांचे विरुध्द लाचेची सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांनी संबंधीत तलाठी यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील 2000/-रुपये दराची 01 चलनी नोट व 500/-रुपये दराच्या 06 चलनी नोटा असे एकुण 5,000/-रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांनी आणखीन 10,000/-रुपये बाबत विचारणा केली असता माझ्याकडे नसल्याचे सांगितले. तलाठी यांनी 15,000/-रुपये लाचेची मागणी केली असल्याने व माझ्याकडे 5,000/-रुपये असल्याने उर्वरती 10,000/-रुपये हे बाजारातील डम्मी नोटा देण्याचे सर्वानुमते ठरवुन पोलीस उपअधीक्षक बेद्रे साहेब यांचेकडे उपलब्ध असलेले 500/-रुपये दराच्या डम्मी 20 नोटा देण्याचे ठरविण्यात आले. मला व पंचाना अन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटाला व डम्मी नोटांना पोक धारेकर यांनी अन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन व लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या खिशातील रुमाला डाव्या हाताने काढुन तोंड पुसल्या सारखे करुन सुनियोजीत ईशारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवही बाबत सुचना दिल्या.पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांचे सुचनेनुसार पोलीस कर्मचारी सुरवसे यांचे मदतीने डिजीटल व्हाईस रेकर्डर मशिन 18.34 वा. चालु करुन माझ्या गळयात आडकाविली असता मी पंच क्रमांक 1 टेकाळे असे व सापळा पथकातील सदस्य व पंच क्रमांक 2 असे शासकीय वाहनामधुन उतरुन आमच्या पाठीमागे पायी आले मी पंच क्रमांक 1 टेकाळे असे मोटार सायकलवर तलाठी यांच्या खाजगी कार्यालय समोर गाडी लावुन तलाठी यांच्या खाजगी कार्यालयात बसलेल्या तलाठी यांचे जवळ जावुन त्यांच्याशी माझ्या कामाबाबत चर्चा केली असता पंचासमक्ष संबंधीत तलाठी यांनी चल आणला का रे ? म्हणुन माझ्याकडील अन्थ्रासीन पावडरयुक्त 15,000/-रुपये (ज्यात 2000/-रुपये दराची 01 चलनी नोट व 500/-रुपये दराच्या 06 भारतीय चलनी नोटा व 500/-रुपये दराच्या डम्मी 20 नोटा असे एकुण 15,000/-रुपये ) लाचेची रक्कम काढुन संबंधीत तलाठी यांचे समोर धरुन करा तेवढ काम म्हणालो असता सदर लाचेची रक्कम त्यांने आपल्या उजव्या हाताने घेवुन अंगातील पन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. मी नियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला असता पोलीस उपअधीक्षक बेद्रे व पंच क्रमांक 2 व सापळा पथकातील सदस्य असे सदर ठिकाणी आले. माझाकडील व्हाईस रेकर्ड हे पोलीस कर्मचारी सुरवसे यांचेकडे दिला ते त्यांनी घेवुन बंद केला. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांनी पंच क्रमांक 1 यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली ? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 यांनी समोर खुर्चीवर बसलेल्या इसमाकडे हात करुन सांगितले की हे तलाठी असुन त्यांनी लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम आपले उजव्या हाताने स्विकारुन पन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली आहे. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांनी त्यांचेकडील ओळखपत्र संबंधीत तलाठी यांना दाखवून त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव बालाजी केशवराव भोसले वय 37 वर्षे व्यवसाय शासकीय नोकरी पद तलाठी वर्ग-3 नेमणूक तहसील कार्यालय, निलंगा सज्जा उमरगा हाडगा व काटेजवळगा ता. निलंगा जि. लातूर रा. किल्लारी ता. औसा जि. लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांनी पंच क्रमांक 2 आकनगिरे यांचे हस्ते संबंधीत तलाठी भोसले यांच्या पन्टच्या खिशातील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 टेकाळे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांनी तलठी यांना माझ्या कामाच्या संचिके बाबत विचारणा केली असता तलाठी यांनी त्यांच्याकडील कपाटमधील संचिका काढुन दिली. त्यानंतर तेथील आवश्यक ती कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पोलीस उपअधीक्षक बेद्रे यांनी पुढील कायदेशिर कार्यवाही ही पोलीस स्टेशन निलंगा येथे करण्याचे ठरवुन संबंधीत तलाठी भोसले यांना ताब्यात घेवुन निलंगा येथे येवुन पुर्ण केली. तरी यातील लोकसेवक बालाजी केशवराव भोसले वय 37 वर्षे व्यवसाय शासकीय नोकरी पद तलाठी वर्ग-3 नेमणुक तहसील कार्यालय, निलंगा सज्जा उमरगा हाडगा व काटेजवळगा ता. निलंगा जि. लातूर रा. किल्लारी ता. औसा जि. लातूर यांनी माझ्या व माझ्या भावाचे नावे मौजे खडकउमरगा शिवारातील गट नंबर 1 व 141 मधील वडीलोपार्जीत शेती ही वाटणीपत्राप्रमाणे माझी पत्नी व भावजयांच्या नावे फेर करुन देण्याच्या कामासाठी दिनांक 26/02/2020 रोजी 15,000/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम 18.40 वाजता पंचासमक्ष निलंगा येथील खाजगी तलाठी कार्यालयात स्वतः स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द कायदेशिर तक्रार आहे.मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तक्रारी ही पोना सुरवसे यांनी लपटपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रींट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Anil Khelba Chormale(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** Anil Khelba Chormale
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे निलंगा

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**